## INTERNATIONAL INDIAN SCHOOL-DAMMAM
## SUMMATIVE ASSESSMENT -II (MARCH 2014-15)

Subject: Marathi    Time: 3hours    Marks: 90

Name:________________________ Class VII Sec_______ Roll No. : ________

---

**प्रश्न १. एका वाक्यात उत्तरे लिहा:** **8mks**

१] चिमणीच्या घरट्यात किती पिल्ले होती?

२] गुरुंनी शिष्याची परिक्षा घेण्याचे का ठरवले?

३] झाशीच्या राणीने कोणाचा सत्कार केला ?

४] चाफा कमळ यांचे रंग कोणते?

५] घरटे बांधण्यासाठी चिमणा-चिमणीने कोणत्या वस्तू आणल्या?

६] मंगल धाम कशाला म्हटले आहेत?

७] गुरुजींनी रस्त्यावर काय पसरुन ठेवले?

८] झलकारी कोणत्या बाण्याची होती?

**प्रश्न २. थोडक्यात उत्तरे लिहा. (any 3 )** **9mks**

१] गुरूजीनी पहिल्या दोन शिष्यांना आश्रमातच राहण्यास का सांगितले?

२] पप्पूला पिल्लांच्या कोणत्या गोष्टी पाहण्यात मजा वाटे?

३] झलकाराची चित्त्याला कसे ठार केले?

४] कवीने काय विचारु नका, असे म्हटले आहे?

**प्रश्न ३.अ] अर्थ लिहा: (any 6)** **3mks**

१] वेगळा    २] गज    ३] सरिता    ४] हित

५] पुसूनका    ६] सद्धर्म    ७] बेत    ८] सुरक्षित

**ब] रिकामी जागा भरा:** **4mks**

( पराक्रम , शिक्षण , कल्पनेनेच , भेद , कार्यक्रम)

१] पिलाच्या ------------- पप्पूला आनंद व्हायचा.

२] एकदा तीन शिष्यांचे ---------------------- पूर्ण झाले.

३] डाव्या-उजव्या करांत काही, ------------------------ मानुनी फसू नका.

४] सर्व गाव हा ------------- बघायला जंगलाकडे धावला.

**क] कोण कोणास म्हणाले.** **3mks**

१] " तुम्ही मला फाशी दिले तरी चालेल, पण हे गुपित मी बिलकूल सांगणार नाही"
२] " तुमचे शिक्षण अजूनही अपूरे आहे"
३] " स्वयंपाकघरात घरटं कस चालेल?"

**ड] चूक की बरोबर ते लिहा:** **3mks**

१] आई उपाशीपोटीच झोपली.
२] अत्री ऋषींनी शिष्यांची परीक्षा घेतली.
३] जुल्हादने राणीशी बंडखोरी केली होती.

**प्रश्न ४. खालील कवीता वाचा आणि दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा:** **5mks**

आकाश जर आरसा असते,
किती छान झाले असते !
सर्व जगाचे प्रतिबिंब,
स्पष्ट त्यात पडले असते.

सुंदर निर्मळ देखावे,
बसल्याजागी पाहिले असते;
कोठे काय चालले आहे,
चट्टदिशी कळले असते.

रात्र कधी पडलीच नसती,
अष्टौप्रहर दिसले असते;
सुरेख अशा आरसेमहालात,
जग मजेत जगले असते.

१] आकाशरुपी आरशात कोणाचे प्रतिबिंब पडले असते ?
२] आकाशाच्या आरशामध्ये चट्टदिशी काय कळले असते ?
३] आरसेमहाल कशास म्हटले आहे?
४] सुंदर आरसेमहालात कोण मजेत जगले असते?
५] विरुधार्थी शब्द लिहा: १} बिंब २} दिवस

**प्रश्न ५. व्याकरण**

**अ] समानार्थी शब्द लिहा: (any 6)** 6mks

| | | | |
|---|---|---|---|
| १] धेर्य | २] वर्ण | ३] सुमन | ४] कैद |
| ५] लहान | ६] जल | ७] विद्या | ८] वर्तन |

**ब] विरुधार्थी शब्द लिहा: (any 6)** 6mks

| | | | |
|---|---|---|---|
| १] लक्ष | २] डावे | ३] रडणे | ४] फरक |
| ५] मान | ६] उशिरा | ७] यश | ८] सकाळ |

**क] वचन बदाला: (any 6)** 6mks

| | | | |
|---|---|---|---|
| १] लाकडे | २] धर्म | ३] रस्ता | ४] फळी |
| ५] लेकरे | ६] धागा | ७] फाटक | ८] थैली |

**ड] लिंग बदला: (any 6)** 6mks

| | | | |
|---|---|---|---|
| १] काका | २] घोडा | ३] देव | ४] तरुण |
| ५] चिमणी | ६] माळी | ७] वीर | ८] कवी |

**इ] काळ ओळखा:** 4mks

१] पप्पू खोलीत शिरला.

२] तू नक्कीच यशस्वी होशील.

३] मी महिलांची पलटण काढण्यास विचार करत आहे.

४] आपणास मोठे बक्षिस मिळेल.

**फ] विशेषणे ओळखा** 3mks

१] आपल्याला एक गंमत पाहायची आहे.

२] गरीब जनतेला तो मदत करत असे.

३] त्याचे डोळे फार मोठे आहेत.

४] किती सुरेख नाव आहे.

५] गुलाबाचा रंग लाल आहे.

६] त्याचे अक्षर सुंदर होते.

**प्रश्न ६.अ] खालील शब्द शुध्द करून लिहा:** 4mks

| | | | |
|---|---|---|---|
| १] प्तीकार | २] भुमि | ३] वेद्या | ४] पूसु |
| ५] बीचारि | ६] आशिवाद | ७] खुश | ८] ब्रिटीस |

ब] **योग्य विरामचिन्हे घालून वाक्य पुन्हा लिहा: (any 1)** 2mks

१] अगं आई तू हे काय केलंस असे म्हणत पप्पू रडायला लागला

२] ते म्हणाले गुरूदेव आम्हाला आर्शीवाद द्या

क] **खालील शब्दांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा ( वाक्यप्रचार ) (any 2)** 3mks

१] धक्का बसणे २] पाया पडणे

३] चाल करणे ४] नवल घडणे

प्रश्न ७.अ] **खालील उतरा वाचून त्याखालील प्रश्नांची उत्तरे लिहा:** 5mks

श्रावण हा सर्व महिन्यांचा राजा आहे.श्रावणात क्षणात ऊन पडते, तर क्षणात पावसाच्या धारा बरसू लागलात. डोंगरमाथ्यावरुन मेघांची सेना निघाली आहे असे वाटते. तेथून पाढऱ्याशुभ्र झऱ्यांचे ओहळ खाली वाहत येतात. ओल्या रानात निर्झर बागडत असतात.पाठावर गाई आणि वासरे निवांतपणे चरत असतात. बालगुराखी आपला मंजुळ पावा वाजवत गुरांमागे चालत असतात. श्रावणात पक्षी मधुर गान करतात. शेतातून हिरवी पिके डोलत असतात. श्रावण सृष्टीला नवजीवन अर्पण करतो.तो जीवनदाता आहे.

प्र१] मेघ कोठून निघतात? त्यावेळी काय वाटते?

प्र२] श्रावणात वातावरण कसे असते ?

प्र३] बालगुराखी काय करीत असतात ?

प्र४] श्रावणाला जीवनदाता असे का म्हटले आहे ?

प्र५] सर्व महिन्यांचा राजा असे कोणाला म्हटले आहे ?

ब] **कथा लेखन :** 5mks

**मुध्दे** : एक कावळा --------- खूप तहान लागते------- जवळपास पाणी नाही------- एका घरापुढे रांजण------- रांजणाच्या तळाशी पाणी ------- विचार करतो------ युक्ती सुचते----- खडे टाकतो ---- पाणी वर येते-----तहान भागते.

क] **पत्र लेखन** 5mks

मुख्याध्यापकांना सुट्टीसाठी अर्ज देणारे पत्र लिहा.